# सौंदर्य संकल्पना (कलानिर्मिती व जीवन)

गो. कृ. (अप्पा) देशपांडे.




***जे. जे. स्कूल आर्ट मुंबई येथून जी. डी. आर्ट (कमर्शियल)***
***फुलब्राईट स्मिथ शिष्यवृत्ती द्वारे लॉस एंजिल्स (अमेरिका) येथील यु. एस्. ई. एफ. आय. कलेंतील प्रमाणपत्र.***
***पोस्टर डिझाईन्स, घोषणावाक्ये याकरीता महाराष्ट्र शासनाकडून प्रथम पारितोषिके, चित्रपट सेन्सॉर बोर्डाचे सदस्य.***
***अप्लाईड आर्ट, ड्रॉईंग व पेंटींग, फोटोग्राफी यांची यशस्वी प्रदर्शने सादर केली आहेत.***
***कागदी आकर्षक आकाशकंदील तयार करुन त्याची प्रदर्शने.***
***टाकाऊ वस्तू मधून टिकाऊ प्रदर्शनीय वस्तू करण्यात हातखंडा.***
***त्यांनी लिहिलेला 'सौंदर्य संकल्पना' हा कलेच्या प्रांतातील व्यक्तींना मार्गदर्शक ठरेलच परंतु सामान्य वाचकांनाही तो आवडेल. -संपादक.***


ललित कलांतील ''दृक्-कला'' (Visual Arts)सदरांतील रंगरेखा (Drawing & Painting) कलाकृतीतील सौंदर्य संकल्पने बाबत तसेंच

कलानिर्मितीतील माझ्या अनुभवावरुन सर्वसामान्य माणसाशी (Common Man)एखादा संवादात्मक ललित लेख लिहून स्वतःच्या कलानिर्मितीची ओळख करुन द्यावी अशी आग्रहपूर्वक विनंती श्री. रमेश पाटील ह्यांनी केल्यामुळें आज हा लेख लिहिण्याचे धाडस मी करीत आहे. 'धाडस' म्हणण्याचे कारण कीं मला स्वयंम विचाराबाबत, सर्जनशील कल्पनेबाबत 'चित्र-भाषेतून' (Pictorial Language) सर्व सामान्य माणसाशी संवाद सहज साधता येतो. ते फारसे अवघड वाटत नाही. पण त्याबाबत शब्दांकनाद्वारें संवाद साधण्याबाबत मी स्वत: जरा साशंक आहे. ह्या माध्यमातून असा संवाद साधण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. तरीसुध्दा अशा संवादाची समाजातील 'कला-रसिकता' वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक्यता असल्याच्या जाणीवेतूनच हे धाडस करुन आपणाशीं (वाचकाशी) प्रयत्न करुं पहात आहे.


तसा मी 'व्यावसायिक/उपयोजित कला' क्षेत्रांतील, १७ वर्षपूर्वी सेवा निवृत्त झालेला एक 'उपयोजित कला शिक्षक', व सध्या अभ्यासक. महाराष्ट्र शासन सेवेंत असताना- नागपूर-औरंगाबाद व मुंबई येथील शासकीय संस्थांत उपयोजित कलेचा अधिव्याख्या तसेच प्राध्यापक पदावर २८ वर्षे व ७ वर्षे संस्था प्रमुख म्हणून

पोस्टर पेपर, ड्रॉईंग पेपर, थर्माकोल यापासून तयार केलेले आकाशकंदील ▼







मुख्य संकल्पना



मुख्य संकल्पनेपासून साकारलेल्या आकृती




अधिष्ठाता पदावर सेवा रुजूं करुन निवृत्त झालेला माणूस. पण सर्व सांभाळून फोटोग्राफी, ड्रॉईंग ॲण्ड पेंटींग व हस्तकला या विषयाचे 'छंद' जोपासून त्या त्या विषयात बरीच कलात्मक निर्मिती केली व आजही करीत आहे. त्या त्या क्षेत्रांतील प्रदर्शनांत व



स्पर्धांत भाग घेऊन बरीच कलानिर्मिती केली असल्यामुळे आपले स्वानुभवाचे बोल इतरांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने आज अचानक चालून आलेली संधी हातची गमावूं नये ह्या विचारामुळेंसुध्दा पुढील 'शब्दांकन' प्रस्तूत करीत आहे.

पण मग श्री. पाटील ह्यांचेकडूनच समजले किं माझे धाकटे मामेबंधु नागपूरचे डॉ. राम म्हैसाळकर ह्यांनी माझ्याबद्दल बरेंच काही सांगून त्यांना माझ्याकडील मी केलेली विविध प्रकारची कला-निर्मिती अवश्य पहावी असे सुचविले व त्यानुसार श्री. पाटील कुठल्याही प्रकारे संकोच न बाळगता माझ्याकडे आले. मी देखील हातचे कांहीं राखून न ठेवता माझ्या सर्व प्रकारच्या कलाकृती त्यांना दाखविल्या. उपयोजित कलेच्या अंतर्गत असलेली भित्ती-चित्रे(पोस्टर्स) दाखविली. रंगरेषा सदरांतील भौमितिक आकारांचा वापर करुन तयार केलेली-पेंटींग्ज, ग्राफीक्स व ग्राफिक डिझाईन्स दाखविली. हस्तकलेच्या अंतर्गत केलेले 'आकाशकंदील', टाकाऊतून टिकाऊ कलावस्तू व काष्ट-कलेचे नमुने दाखविले. तसेंच फोटोग्राफी विषयातील कलानिर्मिती दाखविली. हे सर्व पाहून त्यांनी मला हा लेख लिहिण्याची विनंती केली.हा लेख सचित्र असावा व मलाही नीट संवाद साधता यावा ह्या



हेतूने काही कलाकृतींची छायाचित्रे सोबत जोडली आहेत.

चित्रकलेतील सौदर्य संकल्पनेचा विचार करतांना चित्रकला निर्मितीतील इतिहासपूर्व काळापासून ते आजपर्यंत घडलेल्या स्थित्यंतरांचा आढावा घेणे उचित ठरेल. पण तो घेत असतांना आज मी फारसा खोलांत शिरु इच्छित नाही. ललित कलांतील दृक्-कलांचाच (Visual Arts) विचार करावयाचा म्हटले तरी त्यांत प्रामुख्याने ''रंग-रेखा कला'', शिल्पकला, वास्तूकला, उपयोजित कला इत्यादिंचा समावेश होतो. त्यांतील प्रत्येक कलेबद्दल उहापोह करावा म्हटले तर प्रत्येक कलेच्या संदर्भात वेगवेगळा स्वतंत्र लेख लिहावा लागेल. तेव्हा आज रंग-रेखा कलेच्या संदर्भातच थोडक्यात विचार करु या.

परफॉर्मिंग आर्टस सादर करणाऱ्या व्यक्तिला कलावंत म्हणून संबोधिल्या जाते. तर दृक्-कलांतील रंग-रेखा कलेची निर्मिती करणाऱ्या व्यक्तीला कलाकार अथवा चित्रकार म्हणून संबोधितात. चित्रकाराच्या

निपुणतेवरच त्याच्या कला-निर्मितीचा दर्जा ठरतो. व त्याच्या दर्जेदार कला-निर्मितीला 'कलाकृती' म्हणून संबोधिल्या जाते.

संगीत-नृत्य-नाट्य-वास्तुकला-शिल्पकला-रंग रेखा कला-उपयोजित कला व हस्तकला ह्या सर्व ललित कलांचे स्वरुप जरी वेगवेगळे असले तरी त्या त्या विषयांतील कलावंतांच्या धारणांमध्ये मात्र बरेच साम्य असल्याचे आढळून येते. त्या सर्वांचा पिंड सर्वसाधारण माणसांपेक्षा नक्कीच निराळा असतो. असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरु नये. तो कुठल्याही कला क्षेत्रांतील असला तरी तो आपल्या कलेशी निष्ठा राखून असतो. व त्या साधनेतूनच त्याच्या कलाकृती दिवसेंदिवस विकसित पावतात. नांवारुपास पोहोचतात. त्यांची सर्व धडपड आपली कलाकृती आपल्या स्वयंम विचारानुरुप व सर्जनशील कल्पकतेतून निर्माण करण्यासाठी असते. ती निर्मिती जसजशी साकार होत असते तसतशी ती कला-निर्मिती अविष्कृत होत असते. नांवारुपास पोहोचत असते. कांहीतरी अनन्यसाधारण करुन दाखविण्याची कलाकाराची जिद्द असते व त्यातून त्याचा आत्मविश्वास वाढीस लागतो.

एका पाश्चात्य कला समिक्षाने एका प्रसंगी असें म्हटले आहे कीं- "An artist is a person endowed with an enquiring mind, creative- imagination, skill in terms of visual communication, and an urge is to make impact on the outside word, through his art (activity involving creation of beauty for pleasure & joy)"

एका लहानशाच वाक्यांत कलावंताच्या साऱ्या वैशिष्ट्यांची ओळख पटावी असें हे 'शब्द-चित्र' त्या समिक्षकाने यशस्वीरित्या चितारले आहे. अत्यंत साध्या, समजण्यास सोप्या शब्दांची ही सुटसुटीत मांडणी हेच ह्या शब्द चित्राचे वैशिष्ठ्य ठरते व तेच ह्या शब्द-चित्राचे सौंदर्यही ठरते. असे म्हणणे उचित ठरेल.


चित्रकार हीं जेव्हा, आपल्या स्वयंम विचारांची, सर्जनशील कल्पकतेची, रंग, रेषा, आकार, पोत इ. घटकांची कौशल्यपूर्ण सुसंगत मांडणी द्रवरुप साधनांचा वापर करुन, आपले कौशल्य पणास लावतो तेव्हा त्याची ती कला-निर्मिती वैशिष्ठ्यपूर्ण, अनन्यसाधारण कला-कृती ठरते. व त्याचे ते अनन्यसाधारण कौशल्य त्या कलाकृतीतील सौंदर्य ठरते. चित्रकाराच्या स्वयंम विचारांचे, सर्जनशील कल्पकतेचे त्या कलाकृतीतील अविष्करण हे देखील त्या कलाकृतीचे सौंदर्य ठरु शकते असे म्हणणे उचित ठरेल. चित्रकाराच्या सर्जनशील प्रवृत्तीतूनच त्याच्याकडून सौंदर्ययुक्त अनन्यसाधारण कलाकृती निर्माण होवू शकतात असें म्हणणे अतिशयोक्तीचे वाटावयास नको.

"सर्जनशीलता", आदि मानवा इतकीच प्राचीन व मुलभूत असावी. ह्याची प्रचिती म्हणजेच इतिहासपूर्व काळातील 'स्पेन' मधील 'अल्टीमारा' गुहांमधील आजही अस्तित्वात असलेली विविध प्राण्यांची (Bison, Reindeer) व घटनांची (शिकार वगैरेची) कौशल्य पूर्ण, सुंदर व रेखीव बोलकी भित्तीचित्रे. एवढ्या वन्य अवस्थेत असतानाही मानवाच्या ठायी असलेल्या कलेचा जो अविष्कार झालेला आहे तो स्तिमित करणारा असून त्याच अविष्कारात त्या भित्ती-चित्रांचे सौंदर्य दडलेले आहे. असें म्हणणेच योग्य ठरेल.

पुढे संस्कृती विकासाबरोबरच मानवाने धर्म, राज्य, समाज धारणा, ज्ञान-विज्ञान इत्यादी विषयांच्या आपल्या संकल्पना साकार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या संकल्पनांबरोबरच त्याच्या ठायी असलेल्या कलात्मक प्रवृत्तीचा विचारही त्याला करावा लागला असावा. कलात्मक प्रवृत्तीच्या विकासातूनच त्याची कला-संकल्पना साकार होवू लागली असे म्हणता येईल. ही कला संकल्पना जरी मानवाला गवसली तरी मानवी कौशल्य व तत्सम क्लृप्तींचा भागही त्याला तितकाच महत्वाचा वाटला असावा. त्यातूनच तुलनात्मक दृष्ट्या अलिकडच्या काळातील 'ललित कला' ही विस्तारीत संकल्पना उदयास आली असावी. असे म्हणण्यास हरकत नसावी. 'ग्रीक' कला-संकल्पना व 'भारतीय' कला संकल्पना वर (चौसष्ट कलांची) जर आपण दृष्टीक्षेप टाकला तर हे स्पष्ट दिसून येते.


पण पुढे काही काळात 'संरचनेला' (structure ला) जसें महत्व प्राप्त झाले तसेंच आयोजकतेला (Design ला)-मांडणीला, सर्जनशील निर्मितीला (creativity ला) महत्व प्राप्त झाले. आणि हे सर्व जस जसे प्रत्ययास येत गेले तस तसे कारागिरीलाही (craftsmanship लाही) तेवढेच महत्व प्राप्त झाले.

त्यानंतर पुढे आधुनिक काळांत 'बुध्दीवादाचे' युगमान युरोपात उदयास आले आणि सौंदर्याच्या अभ्यासाची बैठकच बदलली. त्याचा परिणाम चित्रकलेतही जे निरनिराळे 'वाद' निर्माण झाले त्यातून प्रत्ययास आला. त्यामुळें आता चित्रकलेतील 'कलाकृती' जो चित्रकार




भित्तीचित्र ▶

कॅनव्हास बोर्डवरील ॲक्रेलिक पेंटींग ▶



घडवितो त्याच्या वैचारीक बैठकीवरच त्याच्या कलाकृतीतील सौंदर्य संकल्पना आधारभूत असणार हे वेगळ्याने सांगावयास नको. पण हे सर्व करीत असताना चित्रकाराची कला-निर्मितीची जी संकल्पनाशक्ती असते त्यावरही त्याच्या कलाकृतीतील कलात्मकता अवलंबून असते. असे आढळून आले. ज्यावेळी ती संकल्पना असामान्य (अनन्यसाधारण) असते त्यावेळी ती कलाकृती नुसतीच कलात्मक रहात नाही तर ती सौंदर्ययुक्तही ठरते. मग ते सौंदर्य स्वयंम विचारातून (original thinking), म्हणजेच आशयातून, सर्जनशील कल्पकतेतून (creative idia)अथवा अत्यंत कौशल्यपूर्ण कारागिरीतूनही (craftsmanship) व्यक्त होवू शकते. असे दिसून येते.

आज आपणांस असें आढळून येते कीं चित्रकला क्षेत्रांतील कलावंत (चित्रकार) प्रयोगशील झाले असून त्यांचा स्वत:च्या कलाकृतीचा आणखी एक दृष्टीकोन निर्माण होत आहे. तो म्हणजे कलाकृतीतील आशय व कल्पकता सांभाळून त्या बरोबरच तिच्यातील आनंददायकता (joy &pleasure) व तिची उपयुक्तता (utility) ह्यावर विशेष भर देवून तिच्यातील सौंदर्यसह तिचा भोवतालच्या वातावरण निर्मितीसाठी (environmental (beauty) development साठी) उपयोग करुन घेण्याचा.

पूर्वीप्रमाणे कलांना हल्ली राजाश्रय अथवा धनिकांचा पाठींबा नसला तरी औद्योगिक विकासाबरोबरच कलेचे नाते तिकडेही जडूं लागले आहे. त्यामुळे कलाकृतीच्या उपयुक्ततेच्या तसेंच तिच्या करवी होणाऱ्या आनंद निर्मितीचाही विचार करणे चित्रकाराला आता क्रमप्राप्त झाले आहे.

पुढे आचार-विचार, आकार, रंग, रेषा ह्यांना प्रतिकात्मक अर्थ प्राप्त झाले व त्यातूनच प्रतिकात्मक चित्रकलेचा (symbolic art) उगम झाला असून तिचा उपयोग (वापर) दैनंदिन जीवनात, सामाजिक स्तरावर फार मोठ्या प्रमाणावर केल्या जात आहे. आतां तर 'संगणक-युग' (computer age ) सुरु झाले असून कलाक्षेत्रात देखील 'संगणक चित्रांकन' (computer graphic) चे पदार्पण झालले असून 'दृक्-श्राव्य' माध्यमात (Audio-visual media) सर्रास वापर होत आहे. ह्या सर्व गोष्टींचा आढावा घेतल्यानंतर आपण अशा निर्णयाप्रत येण्यास हरकत नसावी कीं जेव्हा कलाकृतीतील आशय, कल्पकता तसेंच चित्रकाराचे चित्रांकन-कौशल्य (कारागिरी) आपल्याला भावते-भारावते तेव्हा ती कलाकृती असामान्य (अनन्यसाधारण)ठरते व ज्यामुळे हे असामान्यत्व एखाद्या कलाकृतीला प्राप्त होते तेव्हा तेच त्या कलाकृतीचे खरे सौंदर्य असते. कलाकृतीतील आशय व कल्पकता-मग ते अमूर्त स्वरुपाचे, सहजासहजी न समजणारे गूढ असोत अथवा अत्यंत साधे ( simple) व समजण्यास सोपे असोत कलाकृतीचे खरे सौंदर्य तेंच वाढवितात. कारण कलाकृतीतील आशय व कल्पकतेमुळेच ती कलाकृती पुष्कळदा आपल्याला 'शब्दांच्या पलिकडले' असे काहीतरी सांगत असते. कित्येक कलाकृती पहाताक्षणीच एका दृष्टीक्षेपात आपल्याला सर्व काही सांगतात. तर काही कलाकृतीतील आशय आपल्याला प्रथम अनाकलनीय वाटतात पण त्यांतील आशय-विचारांती समजल्यावर ती कलाकृती आपल्याला भावते, सुखावते. पण त्यासाठी आपल्याला त्या कलाकृतीशी, एखाद्या जाणकार कला रसिकाशी अथवा तिच्या निर्मात्याशी संवाद साधणे आवश्यक असते. आणि मगच आपल्याला त्या कलाकृतीचा आस्वाद घेणे शक्य होते.

वरचे वर कलाप्रदर्शने बघून अथवा जाणकार कला रसिक व चित्रकारांशी संपर्क साधून आपण हे साध्य करु शकतो.

संगीताचे बाबतीतही असेच म्हणता येईल. मी स्वत: शास्त्रीय संगीताचे पध्दतशीर शिक्षण घेतले नसले तरी वरचे वर संगीत सभांना गेल्यामुळे संगीत श्रवणाचा आनंद लुटण्याइतपत कान तयार झालेत व आपण 'तानसेन' होऊ शकत नसलो तरी 'कानसेन' झालोत याचे समाधान वाटते. शास्त्रीय संगीत ऐकण्याची गोडी व रसिकता माझ्यात निर्माण झाली त्यामुळेच आज माझ्या संग्रही संगीत क्षेत्रातील मान्यवर जेष्ठ व श्रेष्ठ कलाकारांच्या तसेच नवोदित कलाकारांच्या शे-दीडशे लाँग प्लेईंग रेकॉर्डस् व जवळ जवळ साडेचारशे ऑडीओ कॅसेटस् माझ्या संग्रही असून त्यापासून मी रोज अडीच तीन तास तरी श्रवणानंदाचा लाभ उठवितो. चित्रकलेच्या बाबतीतही एकदा नजर तयार झाली की चित्रकलेचा आस्वाद सर्वसाधारण व्यक्तीलाही घेता येईल हे देखील मी ठामपणे सांगू इच्छितो. माझी रंग-रेखा कलाक्षेत्रातील यशस्वी वाटचाल कलाप्रदर्शने पाहाण्याने व चित्रकरांशी संपर्क साधूनच सुरु झाली. व त्यामुळेच आज मी आत्मविश्वासाने त्या क्षेत्रांतही कलानिर्मिती करु शकतो. माझ्या माहितीत अशा कितीतरी व्यक्ती आहेत की ज्यांनी कुठल्याही प्रकारचे पध्दतशीर कलाशिक्षण न घेता निव्वळ 'छंद' म्हणून कलासाधना करुन नामवंत चित्रकरांच्या तोडीच्या कलाकृती निर्माण करुन स्वत:ची कलाप्रसदर्शने भरविलीत व ती नावलौकीकांस पात्र ठरली. चित्रकलेतील आपल्याला काही समजत नाही असे म्हणून तिकडे दुर्लक्ष करणाऱ्या व्यक्ती मात्र एका

आगळ्यावेगळ्या आनंदास कायमच्या मुकतात. कलानिर्मितीची जाण असलेल्या व्यक्तीला जर इतर काही छंद असले तर त्यातूनही अशी व्यक्ती सर्जनशील कला निर्माण करु शकतो. छंदातून निर्माण केलेल्या माझ्या कलात्मक वस्तूंबद्दल थोडेसे लिहितो.

लहानपणापासूनच मला फोटोग्राफीचा व चांगल्या चांगल्या चित्रकारांची चित्रे (छापील) जमविण्याचा छंद जडला व तो अजूनही टिकून आहे. मला वाटते या दोन छंदांमुळेच मी पुढे सर. जे. जे. स्कूल आर्टमध्ये शिक्षण घेऊन या क्षेत्रात स्थायी झालो असावा. चित्र जमविण्याच्या छंदाचा कलाशिक्षण घेत असताना रेफरन्ससाठी खूप उपयोग झाला. पुढे कॅलेंडर्स, पुस्तकांची, मासिकांची मुखपृष्ठे, वर्तमानपत्रातील व मासिकातील जाहिराती जमविण्याचा छंद जडविला. त्यातून संशोधक वृत्ती, स्वयंम विचार करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. पुढे विविध आकाराच्या रिकाम्या बाटल्या (खास करुन लिकर बॉटल्स), वेगवेगळ्या आकाराचे प्लॅस्टिकचे टिनाचे डब्बे, टुथपेस्ट ट्युब्जची झाकणे, रंगीबेरंगी दगड, शंखशिंपले जमविण्याचा नाद लागला. सेवानिवृत्त झाल्यावर ह्या सर्वांचा कलावस्तू निर्माण करण्यासाठी उपयोग झाला व आजही होत आहे. लेखासोबत काही वस्तूंची छायाचित्रे दिली आहेत. सेवानिवृत्ती घेतल्यावर वेळ कसा घालवावा हा प्रश्न अद्यापपर्यंत तरी पडला नाही. ह्याचे कारण मी जोपासलेले छंद हेच होय. पस्तीस वर्ष डिझाईन व कलर आणि पोस्टर डिझाईन शिकवल्यामुळे निवृत्तीकाळात पहिली पाच/सहा वर्षे विविध प्रकारचे रंगीत कागद, स्ट्रॉज(थंडपेय पिण्यासाठी वापरतात त्या नळ्या), भरतकामात

▼ भित्तीचित्र




कामासाठी वापरतात त्या टिकल्या, रिबीनी, आरसे, थर्माकोल शीटस् यांचा वापर करुन आकाशकंदीलांची प्रदर्शने भरविली. हल्ली सकाळी फिरावयास जातो तेव्हा रस्त्याच्या बाजूने पडलेल्या झाडाच्या निरनिराळ्या आकारांच्या वाळक्या फांद्या, विविध प्रकारची वाळलेली पाने, गवत अशा वस्तू जमा करुन त्यातून शोभेच्या कलात्मक वस्तू बनवितो व नवनिर्मितीचा आनंद लुटतो. नवनिर्मिती करताना सर्जनशील कल्पकतेबरोबरच त्या वस्तुंच्या उपयुक्ततेबरोबरच विशेष भर देत असतो. हे सर्व छंद जोपासत असताना जो आनंद मिळतो व सुखसमाधान लाभते ते शब्दांतीत करणे अशक्यप्राय आहे.

आपल्याला जो सर्जनशील कल्पकता व निर्मिती तसेच चौकस मनोवृत्तीचा जो दैवी प्रसाद मिळाला आहे त्यात आपली चिकाटी, प्रयत्न, कष्ट व जिद्द प्रमुख वाटा असला तरी जीवनात आपल्यावर वेगवेगळ्या स्तरावर, वेगवेगळ्या वेळी कळत नकळत घडलेल्या संस्कारांच्या देखील तितकाच मोठा वाटा आहे. बालवयात बालवीर संघटना, राष्ट्रीय स्वयंम सेवक संघ, खो-खो, हुतूतू, आट्यापाट्या या देशी खेळांचे क्रिडामंडळ इ. संघटनात सहभाग घेतल्यामुळे एकसंघवृत्ती, समाजसेवा, स्वयंम सेवा, खिलाडीवृत्ती, अनुशासन, सहिष्णुता, सहनशीलता, मनोधैर्य, आत्मविश्वास यासारख्या जीवनावश्यक आचारविचारांचे संस्कार घडले. एकत्र कुटुंब पध्दतीत वाढल्यामुळे एकमेका करु साहाय्य, आप्तांबद्दल व वडीलधारा मंडळीबद्दल आदर, माणसे जोडण्याची वृत्ती, एकमेकासाठी त्याग करण्याची वृत्ती, अतिथींचे आदरतिथ्य करण्याची सवय त्या वयात जी अंगवळणी पडली ती अद्यापही तशीच आहे. उपयोजित कलेचे शिक्षण घेतल्यामुळे प्रत्येक कामात व्यवस्थितपणा, नीटनीटके रहाणी, कामात वक्तशीरपणा आपोआपच अंगवळणी पडला. याच काळात स्पर्धात्मक वृत्ती वाढीस लागली व त्यामुळे खुपदा यशस्वी होत गेलो. यशामुळे हूरळून गेलो नाही की अपयशामुळे निराश झालो नाही. पस्तीस वर्षे विद्यार्थ्यांच्या सहवासात गेल्यामुळे generation gap हा प्रश्नच उद्भवला नाही. अशा मनोवृत्तीमुळेच व स्पर्धात्मक मार्ग पत्करल्यामुळे यशासाठी नवनवीन विचार, कल्पकता, कारागिरीतील नैपुण्य ह्या सर्वांच्या सहाय्याने कलानिर्मितीचा आस्वाद घेत आहे. शेवटी माझ्या मते सर्जनशीलता म्हणजे काय हे सांगून हा संवाद आटोपता घेतो.

"Creativity means an individualistic unique way of looking at routine things. It is presenting the ordinary in an extra ordinary light".

हे सुत्र स्वीकारुन जर जीवन जगण्याचा आपण प्रयत्न केला तर आपले जीवनही आपण extra ordinary घडवून जीवनातील सौंदर्याचा मनमुराद आस्वाद घेऊ शकतो व इतरांच्या ही जीवनात आनंद व सुख (joy and pleasure ) निर्माण करु शकतो.

✧✧✧

-श्री. गो. कृ. देशपांडे.
'भाग्यश्री', बेडेकर गणपतीशेजारी,
पौड रस्ता, कोथरुड, पुणे-३८